
Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५८ वे, अंक ९वा, मुंबई । नोव्हेंबर २०२५
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 58, Issue : 9, Mumbai I November 2025
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50




## विश्वविजेत्या
## भारतीय महिला क्रिकेट संघाचे
## हार्दिक अभिनंदन

# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ


आयोजित

## ‘ज्योतीने तेजाची आरती संगीत मैफिल’

कार्यक्रम







देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५८वे, अंक ९वा,
नोव्हेंबर २०२५
(फक्त सभासदांसाठी)

**श्री. महेंद्र गंधे**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**श्री. मिलिंद सरदेशमुख**
कार्यवाह

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही

भ्रमणध्वनी :
८४१९९०१०८७, ८४१९९०१०८८
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in


Hurda party
at
MF
क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
MELGIRI FARMS
First Time in Hyderabad Where You
Can Roast & Eat HURDA Directly at Farm
From 15 Nov 2025 to 15 Feb 2026
Morning 10:00 to Evening 05:00
One Day Advance Pre - Booking is Mandatory
Call: 70137 78442 | 9392495268
Lunch | Hi-Tea | Farm Visit | Bullock cart Ride | Tractor Ride
Play Area for Children | Toy Train | Swings and Many More, Pluck your own
Vegetables live with our farmers help all in one visit at MELGIRI FARMS.
Farms: S.No. 66, 67, 75 & 76A, Yenkepalli, Bakaram Road, Moindabad Mandal, R.R. Dist, Telangana - 500075
R.O. For Correspondence: 3-4-22, Venkatesh Bhuvan, Dr. Bhoomanna Lane, Kachiguda, Hyderabad 500027
/Melgiri Farms



## मध्यवर्ती मंडळाच्या वतीने कल्याण संस्थेमार्फत विद्यार्थी गुणगौरव

## कृतज्ञता देणगी

* **श्री. सारंग मधुकर धरणगावकर** राहणार नाशिक यांनी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या विविध उपक्रमांसाठी रु. ५०००/- ची देणगी दि. ०९ जुलै २०२५ रोजी दिली आहे, मध्यवर्ती मंडळातर्फे त्यांचे आभार.

* **सौ. वृषाली शिरीष लोहोकरे** राहणार पुणे यांनी श्री. जिवाजी दत्तात्रय कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ शैक्षणिक कार्याला हातभार म्हणून रु. ५०,०००/- ची देणगी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळास दि. ०४ नोव्हेंबर २०२५ रोजी दिली आहे, मध्यवर्ती मंडळातर्फे त्यांचे आभार.

## भावपूर्ण श्रद्धांजली

**नानासाहेब देशमुख (सोलापूर) यांचे वृध्दापकाळाने निधन (९५ वय)**



कै. नानासाहेब देशमुख यांचा लहानपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, जनसंघ व भारतीय जनता पार्टी असा राजकीय प्रवास होता. पहिल्या संघ बंदीच्या काळात त्यांनी कारावास ही भोगला होता. सोलापूर भारतीय जनता पक्षाच्या विद्यमान अध्यक्षा, अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या कार्यवाह सौ. रोहिणी रामभाऊ तडवळकर यांचे ते वडील होत.

आम्ही सर्व ज्ञाती बांधव देशमुख कुटुंबाच्या दुःखात सहभागी आहोत.

# संपादकीय

**भारतीय महिला क्रिकेट संघाचा शानदार विजय**

हरमनप्रीतच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने नवी मुंबईतील डॉ.डी.वाय. पाटील स्टेडियमवर रविवार दि. २ ऑक्टोबर रोजी झालेल्या अतिंम लढतीत दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव केला आणि देशभर याचा जल्लोष साजरा झाला. विश्वविजेता महिला संघात ‘जेमिमा रॉड्रिग्जन’ ही मोठया शहारातील एकमेव खेळाडू होती, कर्णधार हरमनप्रीत पंजाबमधील, उपकर्णधार स्मृती मनधांना सांगलीची, रीचा घोष उत्तर बंगाल, शेफाली वर्मा हरियाणा, दीप्ती शर्मा आग्रा, श्रीचरणी आंध्र, तर रेणुका ठाकुर रोहरू नावाच्या डोगंराळ शहारातून आलेली यांसर्वानी भारतीय महिला क्रिकेटला उंचीवर नेऊन ठेवले आहे. विश्वचषक पटकविणाऱ्या या आपल्या महिला संघाला बीसीसीआयने ५१ कोटीचे रोख बक्षीस जाहीर करण्यात आले आहे या पारितोषिकामध्ये सर्व खेळाडू प्रशिक्षकांचा चमु आणि राष्ट्रीय निवड समितीचा समावेश असेल असे बीसीसीआयने सांगितले आहे. २०११ मध्ये मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर भारतीय पुरूष संघाचे कर्णधार महेंद्र सिंह धोनी यांच्या नेतृत्वाखाली संघाने विजय मिळविला होता. त्यानंतर तब्बल १४ वर्षांनी २०२५ मध्ये भारतीय महिला क्रिकेट संघानी विजय मिळविला आहे. या विजया बद्दल महिला संघाच्या सर्व रणरागिणींचे अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळतर्फे विशेष कौतुक आणि अभिंनदन. महिला क्रिकेटच्या या नव्या पर्वाची ही नांदी आहे, महिला क्रिकेट संघास अनेक शुभेच्छा!

**वंदे मातरम्**

वंदे मातरम् गीताला दीडशे वर्ष होत आहेत. देशाच्या स्वातंत्र्य लढ्याला प्रेरणा देणाऱ्या आणि राष्ट्रीय अभिमान व एकता जागृत करणाऱ्या या गीताच्या रचनेला दीडशे वर्ष होत आहेत. बन्कीमचंद्र यांनी वंदे मातरम् हे गीत अक्षय नवमीच्या शुभप्रसंगी लिहिले होते. सन १८७५ मध्ये अक्षय नवमी ७ नोव्हेंबरला होती. वंदे मातरम् हे प्रथम बंगदर्शन या साहित्यिक नियतकालिकात बन्कीमचंद्र यांच्या आनंदमठ या कादंबरीचा भाग म्हणून प्रसिध्द झाले होते. मातृभूमीचा शक्ती, समृध्दी आणि दिव्यत्वाचे रूप म्हणून गौरव करणाऱ्या या गीताने भारताची जागृत होत असलेली एकता आणि स्वाभिमानी यांना काव्यात्मक अभिव्यक्ती दिली आहे. हे गीत राष्ट्रभक्तीचे कायमस्वरूपी प्रतीक बनले आहे. १८९६ मध्ये रवींद्रनाथ टागोर यांनी वंदे मातरम्ला चाल लावली आणि कलकत्ता येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनात त्यांनी हे गीत गायलेही. वंदे मातरम् ही सांस्कृतिक राष्ट्रवादाची पहिली हाक आणि भारताच्या पुनर्जन्माचा मंत्र ठरेल. २६ ऑक्टोबर रोजी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या मन की बात या कार्यक्रमा दरम्यान वंदे मातरम् या गीताच्या वैभवशली वर्षाची देशाला आठवण करून दिली. वंदे मातरम्!

**– मिलिंद मल्हारराव सरदेशमुख**

**नम्र सूचना**

सर्व मान्यवर सभासद बधूं – भगिनींना कळविण्यात येते की, संस्थेचा दुरध्वनी क्र. २४३०२२७३ / २४३०७५७३ या सेवा खंडित झाल्यामुळे सपर्क करणे अवघड झाले होते त्याकारणे मध्यवर्ती संस्थेने ८४१९९०१०८७ व ८४१९९०१०८८ हे भ्रमणध्वनी (मोबाईल) सुरू करण्यात आले आहेत. सभासदानी यांची नोंद घ्यावी आणि (कार्यालयीन वेळ:- सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.००) या वेळेत वरील दोन्ही भ्रमणध्वनीवर संपर्क करावे.

# साधक चिंतन : याचना व प्रार्थना यातील अंतर

**स.भ. मोहनबुवा रामदासी** (मो. : ९१४६८५५६९१)

याचना आणि प्रार्थना हे दोन्हीही तीन अक्षरी शब्द आहेत पण या दोन्हींच्या अर्थात खूपच मोठा गर्भितार्थ लपलेला आहे. भौतिक विषयांची भूक कधीही पूर्ण होत नसते. अशावेळी आपण देवांकडे, गुरुंकडे, संतांकडे खूप मोठ्या युक्तीवादाने मागणी करत नसतो. मला यातील कशाचीच अपेक्षा नाही मला खरच याची गरज नाही, तरीही अशी व्यक्ती दुसऱ्याच्या नावाने याचना करत असते. याचना म्हणजे एखादी गोष्ट मिळविण्याची, प्राप्त करण्याची तीव्र विनंती. यामध्ये व्यक्ती स्वतःच्या अभावाची जाणीव ठेवून, समोरच्या व्यक्तीकडून (किंवा देवाकडून) काहीतरी मागते. यात मला हवे आहे किंवा माझ्याकडे नाही असा भाव जास्त असतो. उदा. – देवा, मला नोकरी मिळू दे., माझ्या आजारावर उपाय होऊ दे. इ. या वाक्यांत मागणी, अपेक्षा आणि थोडीशी असहायता दिसते. त्यामुळे याचनेत मागणी, अपेक्षा आणि गरज यांचा भाग अधिक असतो. याचनेत नेहमी काहीतरी मागण्याचा भाव असतो. मला हे मिळू दे, माझी इच्छा पूर्ण होऊ दे अशा प्रकारे मन बाह्य गोष्टींकडे धावते. त्यामुळे मनात अस्थिरता, अपेक्षा आणि चिंता निर्माण होतात. ही वृत्ती साधकाला आत्मिक शांततेपासून दूर नेते. याचना केल्याने श्रद्धा अटींवर आधारित राहते. इच्छा पूर्ण झाली तर आनंद, नाही झाली तर दुःख – अशा भावनेत मन गुरफटलेले राहते. म्हणून याचना ही आत्मोन्नतीसाठी मर्यादित ठरते. याचनेची एकदा सवय झाल्यावर तीच वृत्ती तयार होते. या वृत्तीलाच याचक वृत्ती असे म्हणतात. ही एक वृत्ती असल्याने ती न संपणारी असते आणी त्या वृत्तीची भूक दिवसेंदिवस वाढतच असते. यासोबतच साधना मार्गातील साधकाचा ही एक मोठा अडसर असते. साधनेतील अडथळे अर्थात असे वेगवेगळे अडसर त्याच बरोबर काही मोहाचे प्रसंग असे अनेक प्रकारचे अडथळे असू शकतात. ज्याचेवर एकमात्र रामबाण ऊपाय कोणता असेल तर निरपेक्ष आणि निःस्वार्थ भावातून भगवंताची केलेली प्रार्थना. प्रार्थना म्हणजे देवावरील श्रद्धा, कृतज्ञता आणि आत्मिक संवाद. यात केवळ मागणे नसते, तर स्वतःला देवाच्या अधीन मानून शांततेने त्याच्याशी संवाद साधणे असते. यात विनम्रता, आभार आणि आत्मिक शांतीचा भाव असतो. उदा. हे प्रभु, मला योग्य मार्ग दाखव., तुझ्या इच्छेनुसार सर्व काही होऊ दे. या वाक्यांत कृतज्ञता आणि स्वीकार आहे, मागणी नाही. त्यामुळे प्रार्थना ही आत्मसमर्पणाची आणि कृतज्ञतेची भावना असते. प्रार्थनेचे सामर्थ्य खूप मोठे असते ज्याची आपण कल्पनाही करु शकत नाही म्हणून अशी प्रार्थना करणं साधकाचे आद्यकर्तव्य असते. प्रार्थनेत आर्तता भाव निर्माण होणं हे केवळ गुरुकृपेनेच साध्य होऊ शकते. त्यासाठी आपले प्रयत्न ही तितकेच महत्वाचे असतात म्हणून साधकाने प्रार्थनेचे महत्व अंतःकरणपूर्वक जिवापाड जपावे, आणी याचना आणि प्रार्थना याची गल्लत करु नये. प्रार्थनेत मात्र समर्पण, कृतज्ञता आणि श्रद्धा असते. प्रार्थना म्हणजे देवाशी अंतर्मुख संवाद. यात मागणी नसते, तर स्वीकार असतो. साधक म्हणतो – हे प्रभु, मला तुझ्या इच्छेप्रमाणे वागण्याची बुद्धी दे. अशा भावनेने केलेली प्रार्थना मनाला शांत करते, अहंकार कमी करते आणि श्रद्धा दृढ करते. प्रार्थनेतून साधकाला आत्मिक शक्ती मिळते, संकटातही धैर्य टिकते आणि कृतज्ञतेची भावना वाढते. याचना देहाच्या गरजा पूर्ण करते, पण प्रार्थना आत्म्याला समृद्ध करते. म्हणून साधकासाठी प्रार्थना हा मार्ग अधिक हितकारक आहे. ती त्याला अंतःशांती, स्थैर्य आणि ईश्वराशी एकरूप होण्याचा अनुभव देते. याचनेत आपण देवाजवळ मागतो तर प्रार्थनेत सद्गुरु आपली याचक वृत्ती कमी करुन शाश्वत सुखशांतीचा अनुभव देत असतात.

# ग्रामीण भागातील दिव्यांग मुकबधिर विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता मूकबधिर निवासी शाळा सावनेरच्या माध्यमातून सुरू असलेले कार्य

**संकलन : नारायण गोविंदराव समर्थ (मो : ९३७१४८६२८५)**

शिक्षण हा जीवनाचा अत्यावश्यक पैलू आहे. शिक्षण हा प्रत्येक माणसाचा मूलभूत अधिकार आहे. एक चांगले भविष्य घडविण्यासाठी, सक्षम बनण्यासाठी शिक्षण अत्यावश्यक आहे. शिक्षण घेण्यासाठी व्यक्तीचे सर्व इंद्रिय कार्यान्वित असणे गरजेचे आहे. परंतु ज्यांना ऐकायला न आल्यामुळे बोलता येत नाही अशा बालकांचे काय? त्यांचे भविष्य कसे घडणार?

अशाच कर्णबधिर दिव्यांग बालकांच्या शिक्षणासाठी श्री मंगल बहुउद्देशीय शिक्षण, तांत्रिक प्रशिक्षण व प्रशिक्षण संस्था, रामनगर, नागपूर यांच्यातर्फे १९९४ मध्ये नागपूर पासुन ३५किमी अंतरावर महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशाच्या सीमेवर वसलेल्या सावनेर या गावात दिव्यांग प्रवर्गातील मूकबधिर निवासी शाळेची स्थापना करण्यात आली. शहरी भागातील कर्णबधिरांना मिळणारा लाभ ग्रामिण भागातील कर्णबधिरांना सुध्दा मिळावा या प्रामाणिक हेतूने श्री. नारायण व सौ. मंगला समर्थ यांनी काही सहकाऱ्यांना सोबत घेऊन कर्णबधिर बालकांसाठी एक शैक्षणिक प्रवाह सुरू केला होता. सध्या या शाळेने ३०व्या वर्षात पर्दापण केलेले आहे.

सुरूवातीला ३ विद्यार्थ्यांसोबत सुरू झालेला हा प्रकल्प ३० वर्षाच्या प्रदीर्घ वाटचालीत अनेक समाजसेवकांच्या तसेच संस्थांच्या मदतीने नावारूपाला आला आहे. शाळेच्या माध्यमातून कर्णबधिरत्वाचे शक्य

JV MARKETING & INVESTMENTS
*Premium Residential & Corporate Real Estate Advisor*

*Sales And Marketing Of New Projects*
*Pre-leased Commercial & Retail Options*
*Business & Home Loan Assistance*

*Rahul V. Deshpande*
*MBA - Marketing*
*+91 98330 25031*
*jvmarketinginvestments@gmail.com*
*Samarth Raghukul, Gokhale Road South, Dadar West, Mumbai - 400 028*
*MahaRERA ID - A51900028785*
*@jvmarketing18*
*jvmarketing18*

**For enquiries and bookings in new projects across Mumbai, Thane and Navi Mumbai, kindly contact Rahul V. Deshpande - 98330 25031**

तितक्या लवकर निदान करून कर्णयंत्रा मार्फत प्रशिक्षण सुरू करण्यात आलेले आहे. शिक्षणाबरोबरच कला, क्रिडा, शाळाबाह्य उपक्रम व विविध क्षेत्रात सहभागामुळे बालकांचा आत्मविश्वास वाढीस लागत आहे.

मूकबधिर निवासी शाळेची प्रशस्त इमारत, स्वच्छ आणि सुंदर परिसर, विविध खेळांचे साहित्य दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कोमल मनाला स्पर्श करणारे ठरले आहे. या शाळारूपी कुटुंबात घरापासून दूर राहणाऱ्या कर्णबधिर बालकांसाठी सर्व सोयीयुक्त सुसज्ज व प्रशस्त वसतिगृहाची व्यवस्था केली आहे. विद्यार्थ्यांना आरोग्यदृष्ट्या परिपूर्ण सकस आहार तसेच वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येते. शाळेत पायरी १ ते वर्ग ८ पर्यंतचे शिक्षण तसेच ९ व १०व्या वर्गाचे शैक्षणिक मार्गदर्शन देण्यात येते. ज्यामध्ये वय वर्ष ३ ते १८ वर्षापर्यंतच्या मुलामुलींचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासन मान्य पाठ्यपुस्तकातील अभ्यासाबरोबरच हस्तकला, चित्रकला, कार्यानुभव, क्रिडा, संगणक, ई. विषय शिकविल्या जातात. प्रत्येक क्षेत्रात विद्यार्थ्यांना सहभागी करून त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याचा संस्थेचा सदैव प्रयत्न राहिलेला आहे. सोबतच या विद्यार्थ्यांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे याकरीता शाळेत कौशल्य विकास केंद्र सुरू केले आहे. या केंद्रात विविध प्रकारच्या हस्तकला, उद्बत्या, टेलरींग, घरगुती वापराचे साहित्य, फिनाईल, सोप मेंकिग, घर सजावट वस्तु तयार करणे इत्यादीचे प्रशिक्षण या केंद्रात दिले जाते.

विद्यार्थी सुरक्षेच्या दृष्टीने शाळेत अग्निशमन यंत्र, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे, बायोमेट्रिक सिस्टिम, ई. सोयी उपलब्ध आहे. ८वी व १०वी विद्यार्थ्यांना सामान्य शाळेत प्रवेश मिळवून देणे तसेच आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. कर्णबधिरांच्या पालकांना भेडसावणाऱ्या विविध अडचणी व चिंता यावर योग्य ते मार्गदर्शन करून त्यांच्या उज्वल भविष्याचे ध्येय पूर्णत्वास नेण्याचा संस्थेचा मानस राहिला आहे. ३० वर्षाच्या वाटचालीत विद्यार्थी तसेच शाळेला अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले आहे. २०२३ मध्ये या शाळेला ऋ मानांकन प्राप्त झालेले आहे.

दिव्यांग विद्यार्थी कणखर, आत्मनिर्भर, रोजगार देण्यास तयार व्हावा, देशाच्या विकासात त्याचाही मोलाचा वाटा राहावा या उदात्त हेतूने सावनेर तालुक्यातील ही मूकबधिर निवासी शाळा कार्य करीत आहे. या शाळेला विविध सामाजिक संस्थांनी मदत केलेली असुन वैयक्तिक पातळीवर सुध्दा समाजातील मान्यवर दानशुर व्यक्तींनी वेळोवेळी सहकार्य केले आहे. या शाळेच्या उन्नतीसाठी प्रयासच्या सर्व पदाधिकारी व मित्रमंडळ यांनी भेट द्यावी जेणेकरून या संस्थेचा विकास होईल अशी संस्थेची धारणा आहे.

## देशस्थ ब्राह्मणांचा इतिहास

**संकलन : मिलिंद सरदेशमुख**

रामायण काळात ब्राह्मण वर्णाचे एकूण ७२ विभाग होते. वेद, वेदांगे, कल्प, उपनिषद, तथा व्याकरण ग्रंथ यांच्या अध्ययन, अध्यापन तसेच उपचार पध्दतीवर आधारित भिन्न भिन्न गोत्रांच्या कुलपतींनी या विभागाची रचना केली होती. त्यांनतर वैद्यक, मानव्यविद्या, ज्योतिष्य, पूजा विधान, पद, ब्रह्म, जटा, वनस्पती कृषी, मख, होम, हवन असे उपविभाग झाले आणि त्यांची संख्या ४४८ झाली. सर्व ब्राह्मण हे आर्य वंशाचे असून ते बहूंदेवता उपासक आहेत, वेद काळात ही त्यांच्या बहुदैवता उपासना होती. वेदांच्या भ्न्नि भिन्न शाखा आणि गोत्रे या भेदांनी ब्राह्मण वर्ण ओळखला जात होता.

देशस्थ ब्राह्मण ही महाराष्ट्रातील ब्राह्मणांची एक पोट जात असून या वंशाचा पंचद्रवीड ब्राह्मणात होतो.

देशस्थ हे नाव प्रदेश वाचक आहे. घाटावर किंवा देशावर जे वस्ती करतात त्यांना देशस्थ असे म्हणतात. कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, राजस्थान, उत्तरप्रदेश, नेपाळ, इंदूर, ग्वाल्हेर, बुंदेडखंड आणि गुजरात या भागात देशस्थ ब्राह्मण वंश आढळतो. या देशस्थ ब्राह्मण वंशात ऋग्वेदी आणि यजुर्वेदी असे दोन वर्ग आहेत. ऋग्वेदी हे शाकल संहिता शाखेचे ब्राह्मण आहेत. यजुर्वेदी ब्राह्मणात शुक्ल आणि कृष्ण असे दोन भेद आहेत. त्यांना माध्यंदीन आणि कांण्व असेही म्हण्तात. प्राचीव काळी म्हणजे महाभारताच्यापूर्वी त्या देशस्थ ब्राह्मण वंशात सामवेदी, अथर्ववेदी आणि औपनिषदीक असे भेद होते. तथापि, महाभारतोत्तर काळानंतर ते सर्व देशस्थ ऋग्वेदी या ब्राह्मण शाखेत समाविष्ट झाले आहेत. कारण सामवेद आणि अथर्ववेद यांच्या वेदपाठांच्या अध्ययनाची परंपरा कुंठीत झाली आहे. ते कार्य ऋग्वेदी ब्राह्मणांनी आपल्याकडे घेऊन त्या परंपरा जींवत ठेवल्या. त्यामुळे सामवेदी आणि अथर्ववेदी शाखा ऋग्वेदी ब्राह्मणांत संमिलित झाल्या. सांप्रतकाळी देशस्थ ब्राह्मण वंश महाराष्ट्र हीच आपली जन्मभूमी, पुण्यभूमी, कर्मभूमी, पितृभूमी, मानत असलेला दिसतो. तथापि हा वंश मूळ वैदिक आर्यांचा असून उत्तर भारतातून प्रवास करीत विंध्य पर्वत ओलांडून नर्मदा आणि गोदावरी नदींच्या दक्षिण भागाकडे आला. महाभारताच्या युध्दापूर्वी ही ह्या ब्राह्मण वंशाचे काही समूह सह्याद्री पर्वताकडे शिव उपासना करणाऱ्या अथर्ववेदी शाखेच्या साधू - सन्यांशी जनाबरोबर सह्याद्री खंडात वसाहत करण्यासाठी आलेले होते. त्यामुळे भारतीय युध्दानंतर यांचे अनेक वंश महाराष्ट्राकडे आले.

भारतीय युध्दानंतर यजुर्वेदात शुक्ल, कृष्ण असे दोन वेदही क्रमश: याज्ञवल्क्य आणि गौतम यांचा हा शिष्य वर्ग दक्षिण पथाकडे स्थलांतर करून आला. कृष्ण यजुर्वेदाची सर्व सुत्रे त्यांनी दक्षिणेतच नेली आहेत. त्यानंतरच्या बुध्दोत्तर काळात उत्तर भारतात बौध्द धर्म बलवत्तर झाला. कित्येक ब्राह्मण जनांनी बौध्द धर्माचा स्वीकार करून नालंदा बुध्द-महावीहार येथे राहून अध्यक्षापन कार्य करू लागले. ते बौध्द ब्राह्मण पंडीत अशा नावाने ओळखले जातात. त्यांनतर वैदीक धर्मभिमानी क्षत्रीयांनी म्हणजे राजे लोकांनी त्यांच्याबरोबरच्या पुरोहितानी दक्षिणापथाचा आश्रय घेतला. हे पुरोहित ब्राह्मण मुख्यत: शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन या शाखेचे ब्राह्मण होते. त्यांची सर्वात जुनी वसाहत विदर्भात स्थापन झाली. हे सर्व काशी, मिथीला, मथुरा, गया, वृंदावन, आदि भागातून आलेले होते. नंतरच्या काळात त्यांच्यापैकी कित्येक जण गोदावरीच्या तीरावर नाशिक भागात वास्तव्य करू लागले. नंतर गोदातीर हे त्यांचे प्रमुख वस्तीस्थान झाले, असे ते मानू लागले इसवीसनाच्या ४४५ ते ६०० या काळात गोदातिरी पूर्ण स्थायीक झाले होते. त्यानंतर दुष्काळ आणि मुसलमानी आक्रमण या कारणांनी त्यांनी बरीच स्थलांतरे केली आहेत. त्यामुळे या ब्राह्मण वर्गात भिन्न भिन्न प्रादेशिक विभाग जन्मले आहेत. नाशिक, नगर, सातारा, सोलापूर, वऱ्हाड, मध्यप्रांत, खानदेश, मराठवाडा आणि उत्तरकोकण असे प्रादेशिक विभागात ते स्थिर झाले.

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण अगस्त्य, अंगीरस, अत्री, कपिल, कपी, काश्यप, कौशिक, गौतम, जामदग्न्य, नैध्रुव, भारव्दाज, वशिष्ठ, शांडिल्य, आदि बावन्न गोत्रे आहेत. शुक्ल यजुर्वेदी माध्यादीन शाखेची १३० गोत्रे आहेत. यांच्यात उपनामे पुष्कळच आहेत. त्यापैकी पुष्कळ उपनामे जोशी, कुलकर्णी, देशपांडे वष्ठ, शुक्ल, अशा प्रकारची व्यावसाय दर्शक आणि अधिकादर्शक आहेत. काही उपनामे ही ग्रामनामावरून आलेली दिसतात.

देशस्थ ब्राह्मणात स्मार्थ आणि वैष्णव असे दोन प्रमुख पंथ आहेत. स्मार्थ ब्राह्मण हे शंकराचार्यांचे अनुयायी असून ते स्मृती ग्रंथाचे अध्ययन करीत असत. म्हणून त्यांना स्मार्थ असे म्हणतात. ते शंकराचार्यांच्या श्रृंगेरी करवीर आणि संकेश्वर या पीठांना मानणारे आहेत. या तिन्ही पिठावर आरूढ झालेले सर्व पुरूषश्रेष्ठ हे ऋग्वेदी

ब्राह्मणच होते. शुक्ल यजुर्वेदी माध्यदीन ब्राह्मण हे शृंगेरी पिठाचे अनुशाषन मानतात. त्या पीठाचे सर्व पीठासीन धर्मधिकारी या शाखेचे दिसतात. वैष्णव पंथीय देशस्थ ब्राह्मण हे माध्व संप्रदायाचे म्हणजे स्वामी आनंद तीर्थ किंवा मध्वाचार्य यांचे अनुयायी आहेत. स्वामी जयतीर्थ व्यासतीर्थ वादीराज, राघवेंद्र तीर्थ, प्रभुत्तम तीर्थ हे विशेष नावाजलेले माध्व आचार्य मुळात देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणच होते. त्यानंतरच्या काळातही या पंथांच्या आचार्य देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणांची संख्या बरीच आहे.

गेल्या शतकात अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ, महाराज गोंदवलेकर महाराज, डॉ. मुंजे, दादासाहेब खापर्डे, औंधचे बाळासाहेब पंत प्रतिनिधी, कवि चंद्रशेखर, बालकवी ठोंबरे, लोकनायक अणे, नारायण एवं राजहंस (बालगंधर्व), कृष्णराव फुलंब्रीकर, आबासाहेब मुजुमदार, गुळवणी महाराज आदि अनेक पुरूष श्रेष्ठ देशस्थ ब्राह्मण कुळातच जन्माला आले होते.

वरील देशस्थ ब्राह्मणांचा संक्षिप्त इतिहास पाहिल्यानंतर देशस्थ ब्राह्मणांच्या बहुदेवता, उपासना आणि विविध प्रकारच्या व्यवसायामुळे त्यांच्या नावामध्ये सुध्दा व्यवसायिक आडनावांची फार मोठी संख्या आहे. तसे पाहिले पर देशस्थ ऋग्वेदी, यजुर्वेदी, सामवेदी आणि अथर्ववेदी हे ब्राह्मण इतकेच काय परंतु कऱ्हाडे आणि कोकणस्थ या भिन्न भिन्न ब्राह्मणांच्या पोटजाती प्रामुख्याने स्थल उपासनापध्दती, विविध वेदांच्या पठणांचा आणि अध्ययनाच्या पध्दतीमुळे जन्माला आलेले आहेत. देशस्थ, कोकणस्थ आणि कऱ्हाडे हे तर स्थल वाचकच शब्द आहे. ऋग्वेदी, यजुर्वेदी हे वेदाध्यानावर आधारित अशी नावे आहेत. खरं म्हणजे सर्व ब्राह्मण समाजच हा भारतीय समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. कारण ऋचांचा पठण करणारे ऋग्वेदी, यज्ञयाग करणारे यजुर्वेदी, संगीताच्या माध्यमातून मंत्रोचार करणारे सामवेदी आणि भौतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा दुवा साधणारा अथर्ववेदी हे यांच्या मुळेच समाजाची योग्य प्रकारे धारणा होऊ शकली. आज ब्राह्मण समाजाला पोटजाती, गोत्र, प्रवर विविध स्थाने, उपासना पध्दती यामुळे त्यांच्या कर्तव्यदक्षतेमध्ये आणि कर्तव्यपूतीमध्ये अडथळे निर्माण होत आहेत. त्यासाठी या सर्व पोटजाती भिन्न - भिन्न संकुचित विचार प्रवाह बाजूला ठेऊन ब्राह्मण समाजाने संघटीत होण्याची निंतात गरज आहे. ब्राह्मण समाजाने समाजासाठी, देशासाठी, धर्मासाठी, संस्द्धती संवर्धनासाठी जे योगदान दिले आहे. त्याचा प्रत्यय ब्राह्मण समाजातील मंडळीनी केलेल्या कार्याचा आढावा घेतल्यानंतर निश्चीतच ध्यानात येईल.

संक्षेपाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक, शैक्षणिक, धार्मिक आणि राजकीय इतिहासाच्या जडणघडणीला देशस्थ ब्राह्मणांनी बराच हातभार लावलेला आहे. वैदिक धर्माचा सार्थ अभिमान, धर्मपालनाची निष्ठा, पारमार्थिक शिकवण, वेदांत, न्याय, ज्योतिष, व्याकरण, तंत्रशास्त्र, मंत्रशास्त्र, समाजसेवा, वैद्यक, मानव्यविद्या आदि शास्त्रांचा सखोल अभ्यास करून पांडीत्य पूर्ण ग्रंथरचना करण्याच्या अध्ययन कार्यात प्राचीन काळापासून सांप्रत काळापर्यंत ही त्यांची ज्ञानपरंपरा अखंडपणे त्यांचे वंशज चालवित आहेत, असे दिसते.

## संघाची सामाजिक चळवळ डॉक्टर हेडगेवार रक्तपेढी

**डॉ. मनोहर सालफळे (मो. : ९८६९१२९७२५)**

पैसा पेढीत ठेवला की वाढतो. एक सुरक्षितता वाढते, म्हणून पत पेढीत स्वत:हून ठेवले जातात. रक्तही दिले की वाढते. रक्ताचे नाते समाजाशी जुळते. त्यामुळे अनेकांची जीवने सुरक्षित होऊ शकतात. हा विचार करून प्रत्येकाने निदान वर्षातून एकदा स्वत: रक्तदान करावे. आपल्या सर्व मित्रांना व नाते वाईकांना रक्तदानाची

प्रेरणा द्यावी. हा विचार प्रत्यक्षात आणणाऱ्या डॉक्टर हेडगेवार रक्तपेढी स्थापन करण्यात आली. १९९२ मध्ये सन्मित्र सभा या संस्थेने पाच हजार ऐच्छिक रक्त दात्याची एक सूची प्रकाशित केली या प्रकाशना पूर्वी संस्थेने परम पूज्य बाळा साहेब देवरस यांच्या शुभ आशीर्वादाने काही रक्त गत तपासणी शिबिरे आयोजित केली होती. यातूनच एक स्वयंसेवी स्वयंपूर्ण व सेवा भावी पत पेढीची स्थापना करावी अशी कल्पना समोर आली. बाळा साहेबांनी अनुमित दिल्या नंतर रक्तपेढीचे नाव डॉक्टर हेडगेवार रक्तपेढी असे ठरले. डॉक्टर आबाजी थत्ते यांना रक्तपेढी स्थापनेची कल्पना समजल्यावर ताबडतोब त्यांनी स्थापणे पूर्वीच दहा हजार रुपये राशीचा धनादेश अनुदान म्हणून देऊन प्रोत्साहन दिले.

सेवा भाव आणि समर्पणाच्या भावनेने एखादे कार्य हाती घेतले की, समाज पुरुष नेहमी सहकार्याचा हात देतो. ९ मे रोजी बाळा साहेब देवरस यांच्या आशीर्वादाने डॉक्टर हेडगेवार रक्तपेढीचा प्रारंभ झाला. रक्ता अभावी कुणालाही मृत्यू येऊ नये ही या रक्त पेढीचे घोष वाक्य आहे. स्वस्थ समाजाचे रक्त रूग्ण समाजाकडे प्रवाहित करणारी विश्वसनीय संस्था म्हणजेच डॉक्टर हेडगेवार रक्तपेढी असा विश्वास जनतेच्या निर्माण झाला आहे. समाजाच्या सुख दु:खात सहभागी होत असतानाच आम्ही या नया नफा ना तोटा तत्वावर चालणार्या समाज कार्यासाठी समाजाचेच सहकारी घेतले आहे. डॉक्टर हेडगेवार रक्तपेढीचे कार्य समाजाच्या सहकार्यावर, जनतेच्या अनुदानावर उभे आहे. समाजाचा आमच्यावरचा, आमच्या कार्य शैलीवरचा विश्वास ही एकमेव भांडवल आहे. समाजा कडून प्राप्त होणार्या मोठ्या देणग्यांवर सुकाणू समितीचे नियंत्रण आहे. या शिवाय सर्व आर्थिक व्यवहाराचे वार्षिक अंकेशन केले जाते. कर्मचार्यांचा सहभाग व आपले पणाची भावना यामुळे येथील वातावरण खेळीमेळीचे व आपुलकीचे आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विचार केवळ शाब्दिक वा प्रचारकी थाटाचे नाहीत.. ती एक आदर्श जीवन शैली


**JAYANT DESHMUKH**
B.COM., CAIIB DBM

**Dr. AMIT DESHMUKH**
*Assistant Professor* B.Com., MA., Ph.D.

• Authorised Insurance Advisor • Investment Consultant
• Mediclaim • AMFI Registered Mutual Fund Partner

M. : 9930445721 / 9702837022 deshisbijayant@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

◎ Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
◎ Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance
◎ Trustee & Treasurer - Balaji Mandir Trust, Kalyan
◎ President - Karnataka Sangha, Kalyan
◎ Past Vice President - Andhra Association, Kalyan
◎ Past Manager - State Bank of India
◎ Housing Loan Provider
◎ Member - BBNG Kalyan
◎ Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
◎ Joint Treasurer - DRBS Kalyan

◎ Certified Astrologer
◎ Meditation
◎ Palmist
◎ Yoga
◎ Numerologist
◎ Vastu
◎ Bhakti Shastri
◎ Cyber Crime Investigator

आहे. संघाच्या स्वयं सेवकाकडून समाजाच्या अपेक्षा, त्यांची विश्वासा हर्ता हा संघ विचारांचा पाया आहे. कार्यकर्त्यांच्या आचरणाचा आदर्श हाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा खरं प्रचार आहे. डॉक्टर हेडगेवार रक्तपेढी ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रत्यक्ष नियंत्रणात नाही. संघ विचारांचा आदर्श निर्माण करणारे आहे. जन्मदिनी रक्तदान हा या रक्त पेढीचा अत्यंत लोकप्रिय ठरलेले उपक्रम आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एका कार्यकर्त्यांनी जन्मदिनी रक्तदान यावर रक्तदानाच्या रक्ताच्या थेंबांचे महत्व सांगणारे एका कवितेच्या ओळी लिहल्या. बूंद है इसका मोती जैसा । न मिलता ये दे कर पैसा।। तसेच एका स्वयंसेवकाने रक्त दाना बाबत खालील घोषणा लिहल्या. १) अठरा नंतर मतदान । जन्म तिथीला रक्तदान।। २) संकल्प करू या जन्म दिवसा। रक्तदानाचा घेऊ या वसा।। ३) जन्म दिन असे आनंदाचा । निश्चय माझा रक्त दानाचा।। ४) जन्म तिथीला करू संकल्प । रतदाना नसे विकल्प ।। पाश्चिमात्य देशात साधने पैसा सर्व मिळेल. परतू जन्मदिनी रक्तदानाची कल्पना केवळ भारतातच जन्म घेऊ शकते. ही एका विदेशात स्थाईक झालेल्या भारतीयांची उत्स्फूर्त प्रतिक्रिया याबाबत विलक्षण बोलकी आहे. तसेच जन्मदिनी रक्तदान जरूर करा । व्यवसायी रक्त दाता दूर करा।। ही घोषणा या रक्त पेढीचा उद्देश स्पष्ट करणारी आहे. नाना महाराज तराणेकरांनी संदेश पाठवविला. त्यात ते म्हणाले की सेवाधर्म ही अत्यंत श्रेष्ठ आहे. ईश्वरी कार्य आहे. या ईश्वर निर्मित (रक्त) मौल्यवान पदार्थांचा वापर. व्याधींनी ग्रस्त अश्या जीवांना उपलब्ध करून देऊन . त्या ग्रस्त जीवांना जीवन जगण्याचे सुख व आनंद देण्याचे फार मोठे मोलाचे सेवा कार्य आपण स्वीकारले आहे. डॉक्टर हेडगेवार रक्त पेढीचा थयालेसेमिया प्रकल्प अश्या व्याधींनी ग्रस्त जीवांना दिलासा देणारा व त्यांना जगण्याचे सुख व आनंद देणारा आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जेष्ठ अधिकारी सूर्य नारायण राव यांनी आम्हाला व्यावहारिक वेदांत सांगीतलं आहे. समाज बांधवो की कमियो को दूर करणे के लिपे नि स्वार्थ भावसे सेवा करनेवालो मन परिशुद्ध बनता है. एक प्रकारका दैवी अलोलीक आनंद अनुभव मे आता है. इस प्रकार मनुष्य देवत्व की पुर बढता है. यही व्यवहारी क वेदांत है. यही व्यावहारिक वेदांत है. डॉक्टर हेडगेवार रक्त पेढीने सिकल सेल प्रकल्प गांभीर्याने घेतला असून याबाबत मार्गदर्शन व निदान केंद्र सुरू केले आहे. या सर्व प्रयत्नांचा परिणाम असा की डॉक्टर हेडगेवार रक्तपेढी हे जन माणसात विश्वासार्ह असे प्रथम क्रमांकाचे नाव झाले. सामाजिक उत्सव व सणवार, सामाजिक समरसता अश्या विविध स्तरांवर घोष वाक्ये परिणाम कारक ठरली आहेत. १) बंधुस राखी बांधू या । रक्तदानास नेऊ या।। २) समाज व्हा वया समरस। रक्तदानाने करा एकरस।। ३) ममतेतून समरसता । रक्तदानाने एक रस्ता ।। ४) तुम्ही आम्ही सकल बंधु । नाते रक्त दानाने साधू ।। ५) संक्रमणांची तारीख चौदा । रक्तदान नसे सौदा ।। ६) होली पुनवेला रंगोत्सव । रक्तदानाने व्हावा जन्मोत्सव ।। या आणि अश्या घोष वाक्याने डॉक्टर हेडगेवार रक्त पेढीची प्रतिमा उंचावली. या पत पेढीमुळे विविध स्तरावर नाते जुळले आहे. ही विश्वासा हर्ता किती असावे यांचे उदाहरण म्हणजे सलीम जाफरभाई व्यवसायिक असलेले या रक्तपेढीला मानवता मंदिर म्हणतात. सलिम भाईनी ४५ वेळा स्वता रक्त दिले व अन्य ३०० लोकांना रक्त दाना साठी प्रवृत्त केले आहे. ते म्हणतात विश्वास की नीव पर दुनिया चलती है. अछा काम करना भगवान की सेवा है. ही त्यांची भूमिका डॉ. हेडगेवार रक्तपेढी यह एक सामाजिक प्रकल्प है. अन्य रक्त पेढीमे खून का व्यवसाय नजर आता है. अवर यह अपणा पण. मुझे बार बार खिच कर आता हू. हे मनोगत म्हणजे डॉ. हेडगेवार रक्त पेढीचे वेगळे पण दाखवणारे आहे. इथले रक्त आम्हाला चालणार नाही असा पूर्व ग्रह असणार्यांना एखादा मुस्लिम युवक जेव्हा आपल्याबरोबर घेऊन येतो, त्यांच्या वतीने व्यवस्थापकाची माफी मागतो. तेव्हा ती सामाजिक समरसते पणाची पावतीच नसते का?

झाडू पोछा करणारी, सगळ्यांसाठी चहा पानी करणारी गरीब परंतु हसतमुख अशी एखादी बिंडाबाई जेव्हा

जास्त पगाराची नोकरी सोडून देते. नि सांगते की मला नाय पायजे जास्त पैका. या मंदिरात पैका मिळते. त्या परिस पुण्य बी लागते. त्या वेळी ती आम्हाला मनुष्याची देवत्व कडे वाटचाल वाटते. रक्त पेढी ज्यांचे वाढत्या व्यापात कधीतरी असे विनोदी किस्से घडतात. त्या वेळी आबाजी थत्ते यांची आठवण येते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सर्वार्थाने ज्यांचे नाव आम्ही घेतले आहे. त्यांच्या प्रमाणे अत्यंत शुद्ध रक्त आम्ही पुरवितो. रक्त पेढीची एक पिशवी ही समाजातील एका दात्यापेक्षा कितीतरी सरस असते. या विचारांचा आम्ही प्रसार करतो. ईश्वरी आणि सेवा भावी कार्याच्या जाणिवेतून ही वाटचाल सुरू आहे, व पुढेही सुरूच राहील. संघाचे ही एक समरस ता व समजाशी बांधीलकीच नाही का?

## संलग्न संस्था वृत्त

* **मुंबई :** सध्याच्या धावपळीच्या जीवनात शारीरिक आरोग्याप्रमाणे मानसिक आरोग्य देखील तितकेच महत्त्वाचे आहे या विषयावर समाजात सकारात्मक आणि प्रभावी पद्धतीने जनजागृती करण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या अखिल देशासर्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळांने नुकताच ज्योतीने तेजाची आरती या आगळ्यावेगळ्या सांकेतिक कार्यक्रमाचे आयोजन मुंबई येथे केले होते. लक्ष्मीनारायण सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाला मुंबईतील रसिक श्रोत्यांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.आधुनिक वाल्मिकी, शब्दप्रभू ग दि माडगूळकर आणि सुप्रसिद्ध गायक, संगीतकार सुधीर फडके अर्थात बाबूजी यांच्या संगीतमय प्रवासाची बहारदार मैफिलीत धनश्री देशपांडे, अजित परब, श्रीरंग भावे, मृण्मयी फाटक यांनी बहारदार गीते सादर केली. संहिता आणि सूत्रसंचालनाची जबाबदारी श्रीमती उत्तरा मोने यांनी पार पाडली.

* **संभाजीनगर :** दिनांक ०५/१०/२०२५ रोजी देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण समाज मंडळ छत्रपती संभाजीनगर यांचा एम ओ सी केअर अँड रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने महिला मनोरंजनाचा मान पैठणीचा सन्मान कर्तृत्वाचा उपक्रम शास्त्री सभागृह शास्त्री नगर येथे संपन्न झाला. या उपक्रमात एकूण ८५ महिलांनी सहभाग नोंदवून सर्व खेळांचा मनमुराद आनंद लुटला. या कार्यक्रमाचे विशेष म्हणजे दोन ते तीन महिला ७० वर्षाच्या होत्या. वय वर्षे २५ ते ७० वयोगटातील सर्व महिलांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. प्रत्येक स्त्री मध्ये एक अष्टभुजाधारी देवी असते, हे सर्व महिलांनी सिद्ध करून दाखवले.यात अनेक निरनिराळे खेळ घेण्यात आले. या उपक्रमाचे सूत्र संचालन सौ. विशाखा ताई रुपल (नांदगावकर) यांनी केले. या उपक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सौ. गीताताई अनिरुद्ध आचार्य ह्या होत्या. आजच्या युगात महिला विकसित भारत बनण्यासाठी किती महत्व पूर्ण भूमिका पार पाडतात व विविध क्षेत्रात महिला किती योगदान देतात याचे त्यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमाचे मुख्य प्रायोजक एम ओ सी कॅन्सर केअर अँड रिसर्च सेंटर होते. यांचे प्रमुख श्री देविदास बासरकर साहेबांनी कर्करोग उपचारावर ची विस्तृत माहिती दिली. तसेच त्यांच्या तर्फे प्रथम ,द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे पारितोषक देण्यात आले. या कार्यक्रमाचे सह प्रायोजक खालील प्रमाणे होते. १. आरंभ टेक्सटाइल मार्केट २. येवला पैठणी दालन ३. शांभवी कलेक्शन ४. लक्ष्मी रमण क्रियेशन सर्व सह प्रायोजकांनी पण विजयी स्पर्धकास पारितोषक दिले.खास आकर्षण होते ते पैठणी साडीचे. सर्व महिला स्पर्धकांच्या उत्फुर्त प्रतिसादामुळे देशस्थ ऋग्वेदी मंडळाने एकूण सहा विजेते नंबर काढून सगळ्यांना बक्षीस म्हणून पैठणी साडी देण्यात आली. एकंदरीत हा उपक्रम मोनिकाताई चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडला.

* **लातूर :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ लातूरच्या वतीने, दि. ९.११.२०२५ रोज रविवार रोजी १० वी व १२ वी च्या विध्यार्थ्यांना देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाने मुंबई यांनी मंजूर केलेल्या शैक्षणिक

मदतीचे चेक देण्यात आले तसेच समाजातील कु. साक्षी सुरेंद्र कुलकर्णी चाकूर हिने चझडउ परीक्षेत पास झाली म्हणून, प्रा. रत्नाकर धोंडदेव ३२वर्ष प्राध्यापक म्हणून सेवा करून ह सेवानिवृत झाले आहेत व भानुदास भातांबरेकर हे कर्मचारी संघटनेवर पदाधिकारी म्हणून निवड झाल्यामुळे व सचिन दिवाण यांना शाहू भुषण पुरस्कार मिळाल्यामुळे सत्कार करण्यात आला सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ॲड श्रीराम देशपांडे यांनी मार्गदर्शन केले उत्तरादी मठाचे प्रमुख रघुतमाचार्य यांनी आशिर्वचन केले भानुदास भातांबरेकर यांनी समरोप करून आभार मानले सूत्र संचालन नंदकुमार कुलकर्णी यांनी केले तर प्रास्ताविक मान्यवरांचा परिचय प्रा. मधुकर कुलकर्णी शेळगावकर यांनी केले कार्यक्रम यशवी करण्यासाठी वसंत बेंडे, प्रविण देशपांडे, सौदत्ती, अनिल शात्री सचिन दिवाण यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमानंतर श्री लक्ष्मी नृसिंहाची आरती करण्यात आली व नंतर सर्वांना महाप्रसाद देण्यात आला

## जोडीदार निवडा

**वधू पाहिजे** ..........................................................................

* **चैतन्य घनश्याम आमटे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २३/०६/१९९१, **जन्म वेळ :** सकाळी १०.३५, **जन्म ठिकाण :** यवतमाळ, **उंची :** ५.८, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** तुळ, **नक्षत्र :** विशाखा, **नाडी:** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण : बी. ई, एम बी ए** ए **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** ३० लाख, **अपेक्षा:** अनुरूप, **संपर्क :** ९८६७९२८४५२/९५९४०४२५००

* **ऋषिकेश संजय महाशब्दे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १५/०६/१९९१, **जन्म वेळ :** सकाळी ६.४९, **जन्म ठिकाण :** अंबरनाथ, **उंची :** ५.११, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** शांडील्य, **रास :** कर्क, **नक्षत्र :** पुष्य, **नाडी :** मध्य, **गण :** देव, **शिक्षण :** एम. कॉमए **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** ८.५० लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ८१७७९३०३६३/९४२३०८०४३६

* **भूषण विनोद देशपांडे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १०/११/१९९१, **जन्म वेळ :** सायंकाळी ६.५०, **जन्म ठिकाण :** सौदत्ति (बेळगांव), **उंची :** ५.४, **गोत्र :** भार्गव, **रास :** धनु, **नक्षत्र :** मूल, **नाडी :** आद्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** B. E. (Mechanical) Diploma in advanced Computing in CDAC **नोकरी/ व्यवसाय :** Yodha company as software engineer, **वार्षिक उत्पन्न :** ६ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, सुसंस्कृत, सर्वाना समजून घेणारी, नोकरी करणारी सुशिक्षित मुलगी हवी आहे, **संपर्क :** ९७६९७८०५४६/८१०८३०८८८२

* **अंशुल प्रकाश देशकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २६/०६/१९९३, **जन्म वेळ :** सकाळी ८.०४, **जन्म ठिकाण :** नागपुर, **उंची :** ५.८, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** अत्री, **रास :** सिंह, **नक्षत्र :** पूर्वा, **नाडी :** मध्य, **गण:** मनुष्य, **शिक्षण :** MS computer science from NCSU university USA, **नोकरी/ व्यवसाय :** CDSL, **वार्षिक उत्पन्न :** १२. लाख ५० हजार, **अपेक्षा :** उंची ५.३ किंवा त्यावर, गोरा वर्ण, वयात २/५ वर्षाचा फरक, सर्विस करणारी, **संपर्क :** ९८९२१८०७९३

* **अमेय मोहन महाशब्दे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०९/०१/१९९४, **जन्म वेळ :** रात्री १०.५५, **जन्म ठिकाण :** चिंचवड (पुणे), **उंची :** ५.५, **गोत्र :** शांडिल्य, **रास :** वृश्चिक, **नक्षत्र :** ज्येष्ठ, **नाडी :** आद्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी एस सी आय टी ए **नोकरी/ व्यवसाय :** कांजूरमार्ग (मुंबई), **वार्षिक उत्पन्न :** ८ लाख, **अपेक्षा :** मनमिळाऊ, अनुरूप, **संपर्क :** ९८५०५०११६४/९७३०२७३१५०

* **कैवल्य जयंत कानडे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २६/०३/१९९६, **जन्म वेळ :** रात्री ९.२४, **जन्म**

**ठिकाण :** सातारा, **उंची :** ५.८, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** मुद्गल, **रास :** मिथुन, **नक्षत्र :** आर्द्रा, **नाडी :** आद्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी.ई कॉम्प्युटरए **नोकरी/ व्यवसाय :** मॅनेजर एचआर (एल अँड टी कन्स्ट्रक्शन चैनई), **वार्षिक उत्पन्न :** २६ लाख, **अपेक्षा :** सुशिक्षित, गृहकृत्य दक्ष, नोकरी करणारी, कोणत्याही ब्राह्मण पोटशाखेची असावी, **संपर्क :** ९०२९०१२१२१

*** ॲड. अभिजीत प्रकाश चाव्हरे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०५/०७/१९९६, **जन्म वेळ :** सकाळी ७.२८, **जन्म ठिकाण :** वरळी (मुंबई), **उंची :** ५.८, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** वसिष्ठ, **रास :** कुंभ, **नक्षत्र :** शततारका, **नाडी :** आद्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी कॉम, एल एल बी, एल एल एए **नोकरी/ व्यवसाय :** वकीली (कल्याण, उल्हासनगर, ठाणे, मुंबई), **वार्षिक उत्पन्न :** ६ ते ७ लाख , **अपेक्षा :** पदवीधर, नोकरी करणारी प्राधान्य, व्यवसाय असल्यास चालेल, एकत्र कुटुंबात राहणारी, गृहकृत्य दक्ष, सुशिक्षित, **संपर्क :** ९८६९२२९३४९/ ९८६९४३२७४९

*** ऋषिकेश उमेशचंद्र नाईक (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १७/०९/१९९६, **जन्म वेळ :** सकाळी १०.४५, **जन्म ठिकाण :** चोपडा (जळगाव), **उंची :** ५.४, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** पाराशर, **रास :** तूळ, **नक्षत्र :** विशाखा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी ईए **नोकरी/ व्यवसाय :** Avalara Technologies pvt ltd (Pune) (व्यवसाय), **वार्षिक उत्पन्न :** ९ लाख २० हजार, **अपेक्षा :** अनुरूप, सुशिक्षित, **संपर्क :** ९९७०८४५५१०

*** रोहित अशोक गोगटे (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** २५/०४/१९८६, **जन्म वेळ :** सायंकाळी ७.२४, **जन्म ठिकाण :** ठाणे, **उंची :** ५.८, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** वसिष्ठ, **रास :** तुळ, **नक्षत्र :** विशाखा, **नाडी :** अंत्य, **गण:** राक्षस, **शिक्षण : बी. कॉम, पदव्युत्तर,** PGDFM **नोकरी/ व्यवसाय :** लिगल आणि ए एम एल कॉम्प्लॉयन्स सहाय्यक व्यवस्थापक (एस बी आय सिक्यूरिटीज लि.मुंबई), **वार्षिक उत्पन्न :** ११लाख ६०हजार, **अपेक्षा :** किमान पदवीधर अनुरूप, **संपर्क :** ९८६९२३२६८०

*** डॉ. निनाद मोहन मराठे (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** २५/१०/१९९०, **जन्म वेळ :** दुपारी २.४२, **जन्म ठिकाण :** दौंड, **उंची :** ५.७, **रक्तगट :** एबी (+), **गोत्र :** कपी, **रास :** धनु, **नक्षत्र :** पूर्वशाढा, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** एम एस सी पी एच डीए **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** ४ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ८४३३६७९५४९/९०२९७५७९८९

*** स्वप्नील मुकूंद वझे (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** २१/०६/१९९१, **जन्म वेळ :** दुपारी १.०५, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.१०, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** गार्ग्य, **रास :** तुळ, **नक्षत्र :** चित्रा, **नाडी :** मध्य, **गण:** राक्षस, **शिक्षण :** BE **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** १२ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९८२०७३६९३८/९८६९११६५७५

**अमृत रवींद्र नाईक (देशस्थ यजूर्वेदि ब्राह्मण), जन्म तारीख :** १९/०३/१९९४, **जन्म वेळ :** सकाळी ७.२०, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.३, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** कश्यप, **रास :** वृषभ, **नक्षत्र :** रोहिणी, **नाडी :** अंत्य, **गण:** मनुष्य, **शिक्षण :** बी कॉमए **नोकरी/ व्यवसाय :** बँक, **वार्षिक उत्पन्न :** ५ लाख ५० हजार, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क:** ९८६७४३७३३१/९९६७०७८७७३

*** सुदीप सुधीर अवचट (देशस्थ यजूर्वेदि ब्राह्मण), जन्म तारीख :** २०/१०/१९९४, **जन्म वेळ :** सकाळी ९.५१, **जन्म ठिकाण :** दादर (मुंबई), **उंची :** ५.८, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** कश्यप, **रास :** मेष, **नक्षत्र :** अश्विनी, **नाडी:** आद्य, **गण :** देव, **शिक्षण :** एम कॉमए **नोकरी/ व्यवसाय :** ट्रेडिंग, **वार्षिक उत्पन्न :** १० ते १२ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ८६५७१२९६९१/९८६९२१०२२६

*** निनाद माधव जोशी (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** १७/०९/१९९६, **जन्म वेळ :** सकाळी ७.५४, **जन्म**

**ठिकाण:** बदलापूर, **उंची :** ५.११, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** अत्री, **रास :** तुळ, **नक्षत्र :** स्वाती, **नाडी :** अंत्य, **गण:** देव, **शिक्षण :** Post gradution in perfumery & cosmetics management, **नोकरी/ व्यवसाय :** नोकरी; (AARAV FRAGRANCE & FLAVORS PVT LTD, THANE), **वार्षिक उत्पन्न :** १० लाख ५० हजार, **अपेक्षा:** करिअर ओरिएंटेड आणि घराबद्दल विचार करणारी असावी, मनमोकळया आणि समजुतदार स्वभावाची जोडीदार असावी, **संपर्क :** ९८९२१८०७९३

**⁕ अन्वित अनिरूध्द नाटेकर (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** १२/०१/१९९९, **जन्म वेळ :** दुपारी २.३४, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.८, **रक्तगट :** एबी (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** तुळ, **नक्षत्र :** विशाखा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण : एम कॉमए नोकरी/ व्यवसाय :** सर्विस, **वार्षिक उत्पन्न :** १० लाख, **अपेक्षा :** सुसंस्कृत, मनमिळाऊ, पदवीधर/उच्च पदवीधर, सर्विस करणारी, **संपर्क :** ९७६८२८३३४३

## वर पाहिजे ..............................................................................................

**⁕ प्राजक्ता दत्तात्रय आफळे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २७/०५/१९८३, **जन्म वेळ :** रात्री ११.३१, **जन्म ठिकाण :** अंधेरी, **उंची :** ५, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** वृश्चिक, **नक्षत्र :** श्रेष्ठा (शांती केली आहे), **नाडी :** आद्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. कॅाम, **नोकरी/ व्यवसाय : –, वार्षिक उत्पन्न : –, अपेक्षा :** नोकरदार, निर्व्यसनी, घर स्वत:चे, **संपर्क :** ९८३३८७७५५४/९७६९२२८६०६

**⁕ सानिका वेदव्यास कट्टी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०९/१२/१९९५, **जन्म वेळ :** दुपारी १२.२१, **जन्म ठिकाण :** ठाणे, **उंची :** ५.५, **रक्तगट :** बी (–), **गोत्र :** वसिष्ठ, **रास :** वृषभ, **नक्षत्र :** रोहिणी, **नाडी :** अंत्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** एम ए संस्कृत एम ए कथक जर्मन सी १ सर्टिफिकेट, **नोकरी/ व्यवसाय :** व्यवसाय, **वार्षिक उत्पन्न :** ४ लाख, **अपेक्षा :** ठाणे, मुंबईस्थित, उंची ५.८च्या पुढे, **संपर्क :** ९८२०४१४८२३/९८२०५६४७४०/ ९८२०८००२३९

**⁕ गौरी रविंद्र कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २५/०९/१९९९, **उंची :** ५.६, **शिक्षण :** एम. कॉम, **नोकरी/ व्यवसाय :** ठाणे; (Accounts Executive), **वार्षिक उत्पन्न :** ३ लाख ४० हजार, **अपेक्षा :** अनुरूप, सुशिक्षित, निर्व्यसनी, वय – २८ ते ३० पर्यत, ठाणे, मुंबई स्थळ प्राधान्य, **संपर्क :** ८३५६९३७५४१

**⁕ गार्गी दिलीप कानिटकर (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** ११/०१/१९९२, **जन्म वेळ :** सकाळी ५.२७, **जन्म ठिकाण :** बांद्रा मुंबई, **उंची :** ५.२, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** कौशिक, **रास :** मीन, **नक्षत्र :** पूर्व भाद्रपदा, **नाडी :** आद्य,, **गण :** देव, **शिक्षण :** बी कॉम, एमएमएस, आयआयटी डिप्लोमा, **नोकरी/ व्यवसाय :** नोकरी, **वार्षिक उत्पन्न :** १३ लाख, **अपेक्षा :** उच्च शिक्षित बोरिवली ते ठाणे, पुणे, बंगलोर स्थित, वेल सेटल्ड, **संपर्क :** ९८२१४५७०१६

**(घटस्फोटित / पुर्नविवाह)**

## वधू पाहिजे..............................................................................................

**⁕ अमोल अरूण निघोजकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण) (पुर्नविवाह), जन्म तारीख :** १९/०५/१९८३, **जन्म वेळ :** सकाळी ६.२७, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** कर्क, **नक्षत्र :** आश्लेषा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** एच. एस. सी., डिप्लोमा इन ॲनिमेशनए **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** १ लाख ५० हजार, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९७६९९८८३७०

**(टीप : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वत:ची राहील)**

# मुलुंड देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाचा वर्धापन दिन








IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE
%
Attractive Interest Rates*
on savings account and fixed deposits
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
GET UP TO 20%* OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
TICKET
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow*
Complimentary Airport Lounge Access*
067
Attractive discount on all locker types
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
AutoPay
Manage your payments & SIPs using UPI, cards & mobile
*T&C Apply
To know more, please speak to our Customer Service Manager or visit us at www.indusind.com

*With best compliments from*

# SAMARTH
## URBAN CO-OP. CR. SOCIETY LTD.

**HEAD OFFICE:** Samarth Sadan, Gurukrupa Complex, 1st Floor, Maruti Galli, Belgaum. **Ph.: 2431357, 2403968, 4202100**

**RC Nagar Branch:** Bhagirathi, C Scheme, Channama Nagar Main Road, Belgaum. **Ph.: 2443161**
**Tilakwadi Branch:** Samarth Landmark, Opp. Indian Bank, Mangalwar Peth, Tilakwadi, Belgaum. **Ph.: 2430357**
**Shahapur Branch:** 1103, Ground Floor, Bichu Galli, Shahapur, Belgaum. **Ph.: 2431257**
**Khanapur Branch:** 1524/A6, Manerikar Bldg., Belgaum-Goa Road, **Ph.: 6363090655**

### AKSHAY DEPOSIT SCHEME

| | | | |
|---|---|---|---|
| 46 days to 180 days | 6.00% PA | 2 years | 9.00% PA |
| 181 days to 364 days | 6.50% PA | 3 years | 10.00% PA |
| 1 year | 8.00% PA | | |

Senior Citizen 1% extra*

### NIRANTAR

| | |
|---|---|
| 1 year | 8% PA |
| 2 years | 9% PA |
| 3 years | 10% PA |

*T&C Apply



**Adv. Ajay A. Sunalkar**
Chairman



**Rtn. Abhay V. Joshi**
Vice - Chairman

### BOARD OF DIRECTORS

Ganapat A. Kulkarni • Vinayak G. Joshi • Pradeepkumar G. Kulkarni
Arvind S. Kulkarni • Maltesh G. Patil • Sunanda C. Altekar • Chaya N. Joshi
Anil V. Bhandari • Umesh D. Sungar • Parashuram M. Kamble • Ashok H. Pujeri
Raghavendra S. Kesnur - Secretary • Gouri S. Bidi - Gen. Manager

**A LEADING CO-OPERATIVE SOCIETY IN BELGAUM DISTRICT**

anandads

**Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

## विद्यार्थी गुणगौरव - लातूर




Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH